**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 28-02-2022**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-02-28 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-03-01 | 2022-03-02 | 2022-03-03 | 2022-03-04 | 2022-03-05 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.8 | 34.1 | 34.5 | 34.7 | 34.8 |
| किमान तापमान (अं.से) | 18.3 | 18.4 | 18.6 | 18.7 | 18.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 63 | 61 | 59 | 60 | 62 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 32 | 29 | 33 | 30 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8.0 | 8.0 | 7.0 | 7.0 | 8.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 212 | 39 | 95 | 203 | 206 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 2 | 2 | 2 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

कामठी तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार,पुढील पाच दिवस दिनांक ०१ मार्च २०२२ ते ०५ मार्च २०२२ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता तसेच हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

तापमानातील वाढ लक्षात घेता फळबागा व भाजीपाला पिकांना जमिनीतील ओलावा व पिकाची गरज लक्षात घेता ओलीत करावे.रब्बी हंगामातील पिके, फळबागा व भाजीपाला पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे, कीड व रोग व्यवस्थापनासाठी लेबल क्लेम आधारित शिफारशीत असलेले कृषी रसायनांची फवारणी ची कामे स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून करावी. परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

परिपक्व अवस्थेतील हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तीळ | उन्हाळी तीळ पिकास पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली व त्या नंतर ८ दिवसांनी दुसरी विरळणी करून दोन रोपांत १० ते १५ सेंटीमीटर अंतर ठेवावे. तीळ पिकाची सुरुवातीची वाढ हळू असल्यामुळे पिक एक महिन्याचे होईपर्यंत तण विरहित ठेवावे. पिकास आवश्यकतेनुसार २ ते ३ कोळपण्या/ खुरपण्या करून शेत स्वच्छ ठेवावे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे तीळ पिकास १२ ते १५ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | परिपक्व अवस्थेतील हरभरा पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| गहू | परिपक्व अवस्थेतील गहू पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. गहू पिकास जमिनीतील ओलावा व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) मध्ये असताना सिंचन करावे. |
| मोहरी | परिपक्व झालेल्या मोहरी पिकाची काढणीवमळणी ची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | परिपक्व अवस्थेतील जवस पिकाची काढणी व मळणी ची कामे सुरु ठेवावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| आंबा | आंब्याच्या मोहोरावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास तुडतुडे किडीच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % प्रवाही १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % प्रवाही ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन५ टक्के प्रवाही ५ मिली किंवा मिथाईल डिमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आंबावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के प्रवाही १० मिली किंवा पेनकानझोल १० टक्के प्रवाही ५ मिली किंवा सल्फर ८० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ३० ग्राम किंवा डिनकॅप ४८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.आंबा पिकावरील फळगळ कमी करण्यासाठी २० पीपीएम नॅफथालिक एसिटिक एसिड (एनएए) १० लिटर पाण्यात मिसळून मोहोरावर फवारणी करावी. |
| संत्रा | तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १२ ते ५३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ७८ ते १२७ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १४५ ते १८० लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे.झाडांच्या आळ्यामध्ये आच्छादनांचा वापर करावा. आंबिया बहारातील फळ गळ टाळण्यासाठी २-४- डी १.५ ग्राम आणि १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तापमानातील वाढ (३५ ते ४० अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा | संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम परमॅग्नेट १० ग्राम १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालाक्झेल एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) या अमलाची पेस्ट लावावी. मेफेनोक्सम एमझेड ६८ @ २.५० ग्राम प्रती लिटर पाणी किंवा फोसेटील- एएल @ २.५० ग्राम प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. झाडाच्या बुंध्याला ६० सेंमी उंचीपर्यंत ब्रश च्या सहाय्याने बोर्डो पेस्ट लावावी. संत्रा पिकावर सिट्रस सिला व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमिथोक्झाम ०.३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी घ्यावी. |
| मिरची | मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| कोबी | पानकोबी पिकामध्ये मावा (हिरवा व काळा), चौकोनी ठिपक्याचा पतंग व तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| टोमॅटो | टमाटे पिकामध्ये नागअळी, मावा, फुलकिडे, पंढरी माशी व फळे पोखरणाऱ्या अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १८.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टरबूज | लागवड झालेल्या टरबूज पिकास ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. आंतरमशागतीची कामे करून पिक तणविरहित ठेवावे. |
| खरबूज | लागवड झालेल्या खरबूज पिकास ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. आंतरमशागतीची कामे करून पिक तणविरहित ठेवावे. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |